# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक १०

क्र.झोपुप्रा/परिपत्रक/प्र.क्र.२२/प्रशा/९८
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २०.१.१९९८

## परिपत्रक

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाकरिता करण्यात यावयाच्या स्थावर मिळकतीच्या विविध दस्तांऐवजावर सवलतीच्या दराने मुद्रांक शुल्क आकारावे असा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून शासनाकडे पाठविण्यात आला आहे होता. हया अनुषंगाने शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाकरिता करण्यात यावयाच्या दस्तांऐवजावरील देय असलेले मुद्रांक शुल्क रु.१००/- पर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने या संदर्भात दिनांक १९ दिसेंबर १९९७ रोजी निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत माहितीसाठी सोबत जोडली आहे.

सही/
सचिव